# ज्ञानसागर कोचिंग क्लासेस, अहमदनगर

## द्वितीय सत्र परीक्षा

इयत्ता – ८ वी | विषय – मराठी

गद्य–१० ते १७, पद्य– ८ ते १५

वेळ – ३ तास | गुण – ८०

**प्र.१ खालीलपैकी एका विषयावर १५ ते २० ओळी निबंध लिहा.** १०

१) माझे पहिले भाषण
२) माझा आवडता खेळ
३) पृथ्वीवर गुरुत्वाकर्षणाचा परिणाम नसता तर -----
४) माझा आवडता गायक / माझी आवडती गायिका
५) देशाचा आधारस्तंभ – शेतकरी
६) माझा छंद

**प्र. २ अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.** ०४

१) लेखकांची कोणती कथा रशियन लोकांना आवडली होती?
२) तारुण्याचे तीन 'त' कार कोणते?
३) कोणाला उचलुन घेण्याची गरज आहे, असे कवींना वाटते?
४) वाऱ्याची नौबत कोठे वाजत आहे?

**ब) रिकाम्या जागा भरा.** ०४

१) स्वतंत्र भारताच्या मोजक्या केंद्रशासिक प्रदेशांपेकी एक अंदमान – निकोबार ----- आहे.
२) प्रत्येक गाण्यात ----- लावला.
३) लइ ----- मपली बरं कारभारिण.
४) बरसत्या थेंबाथेंबाचा, ----- कोंभ उगवावा.

**क) जोड्या लावा.** ०४

| अ गट | | ब गट |
|---|---|---|
| १) रशियातील भ्रमंती | अ) | बा.सी. मर्ढेकर |
| २) दुसऱ्या संधीचे सोने! | ब) | प्र. के. अत्रे |
| ३) मी वक्ता कसा झालो? | क) | अण्णा भाऊ साठे |
| ४) कितीतरी दिवसांत | ड) | विठ्ठल वाघ |
| | इ) | समीर कर्वे |

**प्र.३ अ) खालीलपैकी <u>एका प्रश्नाचे</u> उत्तर १० ते १२ ओळीत लिहा.** ०४

१) लेखकांना वार्षिक संमेलनाच्या वक्तृत्व स्पर्धेत कोणते बिनखर्ची बक्षीस मिळाले?
२) गोट्या या खेळाच्या प्रकाराविषयी माहिती लिहा.
३) सुनीताचे लहानपणचे छंद कोणते होते ते सांगा.

**ब) खालीलपैकी <u>तीन प्रश्नांची</u> उत्तरे सहा / सात ओळीत लिहा.** ०९

१) लेखकांबद्दन मजकूर छापताना 'सुलतान फेम अण्णा भाऊ साठे' असे का लिहिले जात असे?
२) सावरकरांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी कोणत्या हालअपेष्टा सहन केल्या?
३) आशाताईंचे बालपण कसे गेले?
४) स्वतंत्र भारत सरकारने चलनव्यवस्थेत काय काय बदल केले?
५) अंतराळातले वास्तव्य कठीण होते, असे सुनीताला का वाटले?

पुढे पहा...

DNYANSAGAR A'Nagar

**प्र.४ अ) खालीलपैकी <u>एका प्रश्नाचे</u> सविस्तर उत्तर लिहा.** ०४

१) 'मीठ भाकरी गरिबाची घ्या गोड करोनी तुम्ही,' असे कारभारी का म्हणतो?

२) 'कितीतरी दिवसात' या कवितेतून कवींनी आपल्या मनाची समजूत कशी घातली?

३) 'येवढे द्यावे' या कवीतेतील कवींनी कोणाजवळ काय काय मागितले आहे?

**ब) खालीलपैकी <u>दोन प्रश्नांचे उत्तर</u> चार ते पाच ओळीत लिहा.** ०६

१) सूर्यकुलाशी नाते सांगणाऱ्या व्यक्तींनी काय करावे, असे कवींना वाटते?

२) मुक्या जिवांना कोणत्या वेदनांना सामोरे जावे लागते?

३) महाराष्ट्राच्या स्वागताला कोण कोण मानाच्या धनिणी आलेल्या आहेत?

४) कवींनी नळाला तोतरा का म्हटले आहे?

**प्र.५ अ) संदर्भासह स्पष्टीकरण करा. (फक्त १)** ०३

१) मनाच्या वेगापुढे जगातील सर्व वेग निकामी आहेत.

२) मी गावाकडचा एक भोवरा घरी आणून ठेवलाय.

३) जसा रतीब घेऊन भय्या जातो नं दुधाला, तसं जाऊन रोज गाणं शिकायला बसायचे.

**ब) संदर्भासह स्पष्टीकरण करा. (फक्त १)** ०३

१) हे पगा, काढलंच पाणी, आंघुळ कराया चला.

२) घणांचे घाव होताना, फुलांनी सांत्वना द्यावे.

३) नामयाच्या जनाईने
केले सडासंमार्जन,
हात अबीर – मंजिरी
गंधे भारिले गगन!

DNYANSAGAR

**प्र.६ अ) खालील शब्दांचे संधी करा. (फक्त २)** ०२

१) निद्रा + अधीन　२) अंतः + करण　३) सम + अंतर　४) दुः + मीळ

A'Nagar

**आ) खालील सामासिक शब्दांचे विग्रह करुन समासाचे नाव लिहा. (फक्त २)** ०२

१) सुर्योदय　२) बापलेक　३) जागोजागी　४) लंबोदर

**इ) खालील एका अलंकाराचे लक्षण सांगून उदाहरण लिहा.** ०२

१) यमक　२) अनुप्रास　३) उपमा

**ई) खालीलपैकी एका वृत्ताची लक्षणे सांगून उदाहरण लिहा.** ०२

१) भुजंगप्रयात　२) वसंततिलका　३) मालिनी

**उ) खालील शब्दाचे अर्थ लिहा. (फक्त २)** ०२

१) भ्रमंती　२) अंतराळवीर　३) पाहुणचार　४) तत्पर

**ऊ) खालील विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा. (फक्त २)** ०२

१) आवडता　२) आठवण　३) उजेड　४) पवित्र

**ए) खालील समानार्थी शब्द लिहा. (फक्त २)** ०२

१) झुंज　२) रियाज　३) पाणी　४) भुई

**ऐ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (फक्त २)** ०२

१) प्रक्षेपित करणे　२) काळ्या पाण्याची शिक्षा होणे

३) अनमान करणे　४) जलमय होणे

**प्र.७ खालील एका विषयावर पत्रलेखन करा.** ०४

१) तुम्ही केलेल्या प्रवासाचे वर्णन पत्राद्वारे तुमच्या मित्राला / मैत्रिणीला कळवा.
(लिफाफा काढणे आवश्यक)

<u>किंवा</u>

२) वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले त्याबद्दल तुमच्या भावाला / बहिणीला अभिनंदनपर पत्र पाठवा. (लिफाफा काढणे आवश्यक)

पुढे पहा...

**प्र.८ खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या भाषेत लिहा.** ०५

विद्येमुळे जे लोक थोर झाले, श्रेष्ठपणा मिळवते झाले, ते सर्वच्या सर्व फार बुद्धिमान होते, असे दिसून येत नाही. त्यातील काहींनी तर आपण सर्वसामान्य बुद्धिमत्तेचे विद्यार्थी होतो असे स्वत:च सूचित केले आहे. स्वत:च्या बुद्धिमत्तेबद्दल अभिमान वाटावा अशी लहानग्या मोहनची म्हणजे महात्मा गांधींची स्थिती नव्हती. उलट अभ्यासात एखादे बक्षीस किंवा शिष्यवृत्ती मिळाली तर त्यांना आश्चर्य वाटे. एक–एक परीक्षा उतरणं म्हणजे डोंगर चढणंच होय असे त्यांना वाटे; पण आपला अभ्यास सुधारण्यासाठी त्यांनी खूप वाचन केले, पाठांतर केले आणि आपल्या शिक्षकांकडून होणाऱ्या शिक्षेला पात्र होऊ नये म्हणून त्यांनी फार काळजी घेतली. उशिरा का होईना पण आपले हस्ताक्षर सुधारण्याचा त्यांनी खूप प्रयत्न केला. आपलं हस्ताक्षर खराब आहे, याचे त्यांना फार वाईट वाटे, म्हणून तुम्हा विद्यार्थ्यांकरता महात्मा गांधींनी असे लिहून ठेवले आहे की, चांगले अक्षर हे विद्येचे आवश्यक अंग आहे.

विद्यार्थ्यांनी प्रथम आपलं हस्ताक्षर सुंदर, मोहक बनवले पाहिजे, असा समर्थ रामदास स्वामींचाही आग्रह होता.

'ज्याचं वय लहान आहे, त्या मुलानं इतकं जपून काळजीपूर्वक लिहावं की त्यांचे अक्षर पाहूनच लोक मोहित व्हावेत,' असा समर्थांनी तुम्हाला जो प्रेमळ उपदेश केला आहे तो नित्य ध्यानी असू द्या.

DNYANSAGAR

प्रश्न –

१) महात्मा गांधीना लहानपणी कोणत्या गोष्टीचे आश्चर्य वाटे? १

२) महात्मा गांधींनी अभ्यास सुधारण्यासाठी कोणते परिश्रम घेतले? १

३) महात्मा गांधींनी विद्यार्थ्यांकरीता काय लिहून ठेवले आहे? १

४) समर्थांनी विद्यार्थ्यांना कोणता प्रेमळ उपदेश केला आहे? १

५) या उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. १

A'Nagar

**प्र.९ खालील उतारा वाचून त्याचा १/३ सारांश तुमच्या शब्दात लिहा.** ०४

टिळकांनी सरकारला सतत जहाल टिकेच्या धारेवर धरले होते म्हणून ते सरकारला नकोसे झाले होते. हे सत्य असले तरी पूर्ण सत्य आहे।

सरकारच्या मनात टिळकांविषयी दहशत निर्माण झाली होती. ते केवळ सरकारचे वाभाडे काढीत असत एवढ्याच कारणाने नव्हे, जहाल राष्ट्रीय चळवळीच्या ऐन धामधुमीच्या काळात सरकारवर तोंडसुख घेणारी इतर पुष्कळ माणसं होती, परंतू त्यांपैकी कुणाचीच नव्हे इतकी टिळकांची धास्ती सरकारने घेतली होती. याचं खरं कारण टिळकांच्या लेखनीत आणि वाणीत असा काही विलक्षण गुण होता की, त्यांच्या एकेका अक्षरांबरोबर सामान्य जनतेपैकी शेकडो माणसं चेवानं उठवित.

टिळकांच्या शब्दात खूप मोठी शक्ती होती. वक्तृत्वकलेची इतर कोणतीही लक्षणं एकच की वक्त्याने उच्चारलेला प्रत्येक शब्द श्रोत्यांच्या अंत:करणाला जाऊन भिडला पाहिजे. हे लक्षण ध्यानात घेऊन बोलायचे झाले तर टिळकांच वक्तृत्व फार उच्च कोटीतलं होतं.

<u>किंवा</u>

**खालील मुद्द्यांच्या आधारे गोष्ट लिहा व योग्य शीर्षक द्या.**

लहान मुल –––– आई बाहेर –––– दुसरी स्त्री मुलाला चोरुन नेते –––– आईची कोर्टात धाव –––– मूल आपलेच असल्याचा दोघांचाही दावा –––– न्यायाधीश गोंधळात –––– मुलांचे दोन भाग करण्याचा आदेश –––– खरी आई रडू लागते –––– दुसरी शांत –––– न्यायाधीश ओळखतात –––– निकाल –––– खऱ्या आईस मूल मिळाले.

✽✽✽✽✽